# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: २९ जुलै, २०२२

---

जळगाव, दि. २९ (   ) नवीन शैक्षणिक धोरणात उच्च शिक्षणाच्या अनुषंगाने अमुलाग्र बदल येऊ घातले असून महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी संस्थाचालक, प्राध्यापक आणि विद्यार्थी यांना सोबत घेऊन हे धोरण राबविण्यासाठी सज्ज रहावे, त्यासाठी राज्य शासन सर्वतोपरी सहकार्य करेल असे प्रतिपादन राज्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ.धनराज माने यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास विभाग यांच्यावतीने शुक्रवार दि.२९ जुलै रोजी आयोजित करण्यात आलेल्या प्राचार्यांच्या बैठकीत डॉ.माने बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु प्रा.एस.टी. इंगळे होते. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त घरोघर तिरंगा आणि नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी या दोन प्रमुख विषयांवर डॉ.माने यांनी या बैठकीत मार्गदर्शन केले. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षा निमित्त १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत विद्यापीठ, महाविद्यालये, गाव, आणि घराघरात तिरंगा लावावा. देशाबद्दलची आपुलकी व राष्ट्रभक्तीची भावना भावी पिढीत वाढीला लागण्यासाठी प्राचार्यांनी सर्वांच्या सहकार्याने प्रयत्न करावेत. प्रभात फेऱ्या काढाव्यात असे आवाहन त्यांनी केले. सर्व महाविद्यालयांनी नॅक मानांकन करुन घेणे गरजेचे आहे. पदभरती तसेच प्राध्यापकांची बढती हे सुध्दा नॅकशी निगडीत राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे शैक्षणिक गुणवत्तेत वाढ होण्यासाठी महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकन करुन घ्यावे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी डॉ.माशेलकर यांच्या अध्यक्षतेखालील कृती गटाने दिलेला अहवाल राज्य शासनाने स्वीकारला असून त्याअंतर्गत काही समित्या स्थापन केल्या असून या समित्यांचे काम अंतीम टप्प्यात आहे. या समित्यांचा लवकरच अहवाल प्राप्त होईल आणि हे धोरण राबविले जाईल. अशी माहिती डॉ.माने यांनी दिली.

यावेळी झालेल्या चर्चेत प्राचार्य डॉ. पी.आर.चौधरी, प्राचार्य डॉ. पी.एच.पवार, प्राचार्य डॉ.के.बी.पाटील, प्राचार्य डॉ.अरविंद चौधरी, प्राचार्य डॉ.जे.बी. अंजने यांनी सहभाग घेऊन मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप प्रा.एस.टी.इंगळे यांनी केला. प्रास्ताविक रासेयोचे संचालक डॉ.सचिन नांद्रे यांनी केले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ.सुनील कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन करुन आभार मानले.

**बातमी क्र.२**

जळगाव, दि. २९ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ संचलित सेंटर फॉर इनोव्हेशन, इनक्युबेशन ॲण्ड लिंकेजेसचे काम अधिक प्रभावीपणे करण्यासाठी जळगाव जिल्ह्यातील बँका व उद्योग संघटना यांच्या सहकार्याने नवउद्योजकांना स्टार्ट अप साठी बळ दिले जावे अशी अपेक्षा जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी व्यक्त केली.

विद्यापीठात गुरुवार दि.२८ जुलै रोजी सायंकाळी बँका व उद्योग संघटनांच्या पदाधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत श्री.राऊत बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु प्रा.एस.टी. इंगळे होते. इनक्युबेशन सेंटरचे काम चांगल्या पध्दतीने सुरु असून अनेक तरुणांकडे नवीन उद्योग सुरु करण्याच्या नवीन कल्पना असतात मात्र त्यांना योग्य मार्गदर्शन मिळत नाही. जिल्हा प्रशासनाकडून उद्योगासाठी पैसे दिले जातात. मात्र योग्य मार्गदर्शनाची गरज असल्यामुळे इनक्युबेशन सेंटर, बँका आणि उद्योजक संघटना यांनी एकत्र येऊन जिल्ह्यात स्टार्ट अप वाढीला लागतील यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. खानदेशात उद्योगासाठी मोठा वाव आहे असे श्री.राऊत म्हणाले. प्रा.एस.टी.इंगळे यांनी नवीन स्टार्ट अप साठी या केंद्राच्यावतीने सर्व सहकार्य केले जाईल अशी ग्वाही दिली.

या बैठकीसाठी जिल्हा अग्रणी व्यवस्थापक अरुण प्रकाश, नाबार्डचे जिल्हा विकास व्यवस्थापक श्रीकांत झांबरे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक आर.आर. डोंगरे, बँकेचे प्रतिनिधी श्रीमती प्रितीकुमारी, ईश्वर काळे, निवृत्ती पाटील, प्रियंका झोपे, लघु उद्योग संघटनेचे अध्यक्ष श्यामसुंदर अग्रवाल, सतीष बियाणी, कृषी विज्ञान केंद्र, ममुराबादचे अभियंता वैभव सुर्यवंशी व किरण जाधव, स्टार्ट अप्स प्रतिनिधी डॉ.वासुदेव झांबरे, अर्चना महाजन, रुद्राणी देवरे, कांतीलाल पाटील, अमोल महाजन, सुनील महाजन, विद्यानंद अहिरे, एकनाथ कोटी, आदी उपस्थित होते. प्रारंभी केसीआयआयएल चे संचालक डॉ.विकास गिते यांनी केंद्राची सविस्तर माहिती दिली. व्यवस्थापक निखील कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी